जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०१६/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- २६/१०/२०१६

प्रति,

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

**विषय :-** पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी ) व पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी ) सन २०१६-१७ बाबतच्या प्रसिध्दी निवेदनाबाबत...

**महोदय,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी ) व पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी ) करीताची अधिसूचना लवकरच परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्याबाबतचे प्रसिध्दी निवेदन सोबत जोडलेले आहे. कृपया सदरहू निवेदनास राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रातून, आकाशवाणीवरून व दूरदर्शन केंद्रावरून योग्य ती प्रसिध्दी विनामुल्य देण्यात यावी अशी विनंती आहे.

सोबत :- प्रसिध्दी निवेदन

**आपला विश्वासू**

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१**

**प्रत माहिती व कार्यववाहीसाठी :-**
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दी निवेदन

शासननिर्णय क्र. एफ.ई.डी.-४०१४/६४३/ प्र.क्र.४/एस.डी.-५ दि. २९/०६/२०१५ अन्वये शिष्यवृत्ती परीक्षा इयता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी मध्ये व इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये आयोजित करण्याचे निश्चित केल्यानुसार सन २०१६-१७ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी ) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी ) मध्ये घेण्यात येणार आहे.

सदर शिष्यवृत्ती परीक्षेकरीता ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता परिषदेकडून अदयाप कोणतीही लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. परिषदेच्या असे निदर्शनास आले आहे की, काही खाजगी संस्थांकडून शिष्यवृत्ती परीक्षेची आवेदनपत्रे भरून शुल्क आकारणी केली जात आहेत, परंतु परिषदेचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

परिषदेकडून नोव्हेंबर-२०१६ च्या मध्यावर शिष्यवृत्ती परीक्षा सन २०१६-१७ ची अधिसूचना परिषदेच्या संकेतस्थळावर (www.mscepune.in) प्रसिध्द करण्यात येईल. सदर अधिसूचनेत परीक्षेसंबंधी सर्व सविस्तर सूचना देण्यात येतील. त्याचे वाचन करून त्यानुसारच पुढील कार्यवाही करावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१